# राज्यात आणखी चार दिवस मुसळधार पावसाचा अंदाज



**पुणे :** सिक्कीम ते मध्य महाराष्ट्र या भागावर तीव्र कमी दाबाचा पट्टा तयार झाला आहे. त्यामुळे राज्यात गेल्या २४ तासांमध्ये बहुतांश भागात मुसळधार ते अतिमुसळधार पावसाने हजेरी लावली आहे. अशातच हवामान विभागाने बुधवार (दि. २७)पर्यंत संपूर्ण राज्याला यलो अलर्ट जारी केला आहे. पावसाचा जोर विदर्भात जास्त राहणार असून उर्वरित राज्यात कमी राहणार असल्याचेही हवामान विभागाकडून सांगण्यात आले आहे. गेल्या आठ ते दहा दिवसांपासून बंगालच्या उपसागरात विविध ठिकाणी कमी दाबाचे पट्टे तयार होत आहेत तसेच उत्तर भारतात पश्चिमी चक्रवात सक्रिय झाल्याने हिमालयाच्या पायथ्यापासून ते पंजाब, हरियाणा, दिल्लीपासून मध्य प्रदेशपर्यंत मोठा पाऊस झाला. दरम्यान, गेल्या २४ तासांत महाराष्ट्रात सर्वदूर जोरदार पावसाने हजेरी लावली आहे.

रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १६ ◆ अंक ६८
www.ramprahar.com

रविवार, २४ सप्टेंबर २०२३ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

म्हाडाची घरे देतो सांगून लाखो रुपयांची फसवणूक/२
रविप्रहरमध्ये विविध विषयांवरील लेख/४
खालापुरात हिंदू-मुस्लिम ऐक्याचे दर्शन/७

# नाग'पूर' | ढगफुटीसदृश पावसाने उपराजधानीत हाहाकार

**नागपूर : प्रतिनिधी**

**राज्याची उपराजधानी नागपूर येथे शनिवारी मध्यरात्रीपासून पडत असलेल्या ढगफुटीसदृश पावसाने हाहाकार माजवला आहे. नागपुरात कधी नव्हे इतका पाऊस पडल्याने अनेक भागांत तसेच घरांमध्ये पुराचे पाणी शिरले. या पुरात दोन महिलांचा मृत्यू झाला आहे. नागपूरमध्ये अवघ्या चार तासांत १०९ मिलीमीटर पावसाची नोंद झाली. शहरातील रस्ते जलमय झाल्याने प्रशासन अलर्ट मोडवर आले असून बचाव व मदतकार्य युद्धपातळीवर सुरू आहे.**




अतिवृष्टीने उपराजधानी नागपूर जलमय झाली. नागपूरच्या अंबाझरी भागातील परिस्थिती हाताबाहेर गेल्याने येथे मदतकार्यासाठी लष्कराला बोलावण्यात आले. रात्री झालेला मुसळधार पाऊस आणि त्यानंतर अंबाझरी तलाव ओव्हर फ्लो झाल्यावर परिसरात अनेक ठिकाणी पाणी साचले. वर्मा ले आउट, समता ले आउट या भागात तर १० ते १५ फूट पाणी साचून पहिला माळा पाण्याखाली गेला. तिथे घरात अडकलेल्या लोकांना बाहेर काढण्यासाठी रेस्क्यू ऑपरेशन राबविण्यात आले. या भागात घराघरांमध्ये शिरलेल्या पुराच्या पाण्यामुळे सामानाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून अनेकांचे संसार उद्ध्वस्त झाले आहेत.

याशिवाय मोरभवन स्थानकात १२ ते १५ बसेस पावसाच्या पाण्यात अडकल्या होत्या. यात मध्यरात्री हॉल्ट करून थांबलेले चालकवाहकसुद्धा बसमध्ये अडकले होते. त्यांची सुटका करण्यात आली, तर झाशी राणी चौक ते सीताबर्डी मेट्रो इंटरचेंज जाणाऱ्या मार्गावरून नदी प्रवाहित होऊन शहरात पाणी शिरले. **(पान २ वर..)**

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी घेतला आढावा

नागपूरमधील अतिवृष्टी आणि महापुराचा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सविस्तर आढावा घेत प्रसारमाध्यमांना माहिती दिली. ते म्हणाले, नागपूरमध्ये जवळपास चार तासांमध्ये १०९ मिलीमीटर एवढा प्रचंड पाऊस झाला. त्यामुळे अंबाझरी तलाव भरून पाणी वाहिले. हे अतिरिक्त पाणी नाग नदीतून वाहते. त्यामुळे नाग नदीला मोठा पूर आल्याची स्थिती निर्माण झाली. जवळपास ४०० नागरिकांना पाण्यातून बाहेर काढण्यात आले आहे. त्यांच्यासाठी तात्पुरत्या स्वरूपाची व्यवस्थाही करण्यात आली आहे. आता पाणी हळूहळू ओसरत आहे, मात्र अद्यापही बऱ्याच भागांमध्ये पाणी पहायला मिळत आहे. नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये. प्रशासन पूर्णपणे जागरूक आहे. कुठलीही अडचण असेल, तर त्यांनी प्रशासनाशी संपर्क साधावा, असे आवाहनही उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी केले आहे.



**मुंबई : केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी लालबागच्या राजाचे सपत्नीक दर्शन घेतले. सोबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजप नेते आमदार आशिष शेलार, विनोद तावडे.**



**पनवेल : आमदार प्रशांत ठाकूर यांनी पनवेल शहरातील जुना ठाणा नाका येथील जय महाकाली मित्र मंडळाने प्रतिष्ठापना केलेल्या गणरायाचे दर्शन घेतले. त्यांच्यासमवेत माजी सभागृह नेते परेश ठाकूर, भाजप जिल्हा उपाध्यक्ष जयंत पगडे, सरचिटणीस नितीन पाटील, शहराध्यक्ष अनिल भगत यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, भाविक उपस्थित होते.**

## उल्हासनगरमधील कंपनीत केमिकल टँकरचा स्फोट

### दोन मजुरांचा मृत्यू, पाच जण जखमी

**उल्हासनगर : प्रतिनिधी**

उल्हासनगरमधील शहाडनजीक सेंच्युरी रेयॉन कंपनीत केमिकल टँकरचा स्फोट होऊन दोन मजुरांचा जागीच मृत्यू झाला असून पाच जण गंभीर झाले आहेत. ही दुर्घटना शनिवारी (दि. २३) सकाळी साडेअकरा वाजण्याच्या सुमारास घडली.

टँकरमधून केमिकल काढत असताना स्फोट झाल्याचा प्राथमिक अंदाज पोलिसांनी वर्तवला आहे. सर्व जखमी मजुरांना सेंच्युरी हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले आहे. पोलीस घटनास्थळी दाखल झाले आणि त्यांनी अधिक तपास सुरू केला आहे.

# नव्या पिढीने कर्मवीरांचा वारसा जपावा -लोकनेते रामशेठ ठाकूर

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**



पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी रयत शिक्षण संस्थेच्या माध्यमातून ग्रामीण भागात शिक्षणाचे कार्य अतिशय प्रतिकूल परिस्थितीत सुरू केले. कर्मवीरांना आपल्या कार्यात अनंत अडचणी आल्या, मात्र त्यांनी प्रत्येक अडचणीवर मात केली आणि गोरगरीबांच्या दारापर्यंत शिक्षण पोहचवले. कर्मवीरांचा हा वारसा नव्या पिढीने जपावा, असे आवाहन रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी व्यक्त केले. ते वाशी येथील कार्यक्रमात बोलत होते.

पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांची १३६वी जयंती शुक्रवारी (दि. २२) वाशी येथील केबीपी कॉलेज व मॉडर्न स्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने साजरी करण्यात आली. लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून पद्मश्री डॉ. रवींद्र कोल्हे व पद्मश्री डॉ. स्मिता कोल्हे उपस्थित होते. **(पान २ वर..)**

# गौरी गणपतींना निरोप



**अलिबाग : प्रतिनिधी**

लाडक्या गणेशाची पाच दिवस मनोभावे पूजाअर्चा केल्यानंतर रायगडकरांनी शनिवारी (दि. २३) त्याला भावपूर्ण निरोप दिला. गणपतींसोबत गौरींचेही वाजतगाजत विसर्जन करण्यात आले.

दुपारी चार वाजल्यानंतर ठिकठिकाणी गणेश विसर्जन मिरवणुका विसर्जनस्थळी निघाल्या. गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या अशी आर्जव करीत ढोलताशाच्या गजरात निघालेल्या या मिरवणुकांमध्ये गुलालाची उधळण होत होती. नाशिक बाजा, बेन्जोच्या तालावरही थिरकत मिरवणुका पुढे सरकत होत्या. दक्षिण रायगडमधील महाड, श्रीवर्धन, माणगाव, म्हसळा, मुरूड, रोहा तालुक्यांमध्ये मिरवणुकांत पारंपरिक सनई खालूबाजा आणि त्यावर लेझीम घेऊन नाचणारे गणेशभक्त पहायला मिळत होते, तर काही गणेशभक्तांनी टाळ-मृदुंगाच्या साथीने भजन करीत मिरवणूक काढली. रात्री उशिरापर्यंत मिरवणूका सुरू होत्या. महिलाही मोठ्या संख्येने या मिरवणुकांमध्ये सहभागी झाल्या होत्या, फेर धरून नाचत होत्या.

अलिबाग समुद्रकिनारी गणेशभक्तांच्या स्वागतासाठी खास स्वागत कक्ष उभारण्यात आला होता. तेथून गणेशभक्तांना आवश्यक त्या सूचना दिल्या जात होत्या. निर्माल्य गोळा करण्यासाठी खास व्यवस्था करण्यात आली होती.

आपल्या लाडक्या गणरायाला निरोप देण्यासाठी नागरिकांनी गर्दी केली होती. विसर्जनस्थळी होणाऱ्या सामुहिक आरत्यांनी परिसर दुमदुमून गेला होता. बाप्पाला निरोप देताना वातावरण भारावून गेले होते. ग्रामीण भागात तळे, नदी, ओढे यामध्ये, तर शहरी भागात समुद्र तलावांमध्ये गणेशमूर्तींचे विसर्जन करण्यात आले. रायगड जिल्ह्यात ५८ हजार ६६६ घरगुती, तर ७२ सार्वजनिक गणपतींसह १४ हजार ४५५ गौरींचे विसर्जन करण्यात आले.






## ‘टीआयपीएल’च्या नवीन कार्यालयाचे भूमिपूजन

**पनवेल :** ठाकूर इन्फ्राप्रोजेक्ट्स प्रा.लि. (टीआयपीएल)चे नवीन कार्यालय पनवेल शहरातील अंतिम भूखंड क्रमांक ५०१ येथे साकारत आहे. या कार्यालयाचे भूमिपूजन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते आणि आमदार प्रशांत ठाकूर व माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या उपस्थितीत शुक्रवारी झाले. या वेळी अमोघ ठाकूर, आदेश ठाकूर यांच्या हस्ते पूजा करण्यात आली. या कार्यक्रमास भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, उपाध्यक्ष जयंत पगडे, शहर अध्यक्ष अनिल भगत, माजी नगरसेवक अजय बहिरा, शहर सरचिटणीस अमरिश मोकल, संजय भगत, शकुंतला ठाकूर, वर्षा ठाकूर, अर्चना ठाकूर, स्वप्नील ठाकूर, अपूर्व ठाकूर, आदित्य ठाकूर व कुटुंबीय, टीआयपीएलचे डायरेक्टर सी. भरणीकुमार, मॅनेजर जगदिश घरत, एचआर मॅनेजर शशिकांत मुंबईकर, जनरल मॅनेजर अरुण नाईक, संतोष कडू, संतोष देशमुख, अॅड. विनायक कोळी, अॅडमिन मॅनेजर सतिश उगले, सेफ्टी मॅनेजर सुधाकर थवई, प्रोजेक्ट मॅनेजर रूपेश नेवे, मनोहर पाटील, सरोज कुमार, शिवाजी अहिरकर, ब्रिजेशकुमार शुक्ला, अमित अक्कीनटे, रॉयल्टी विभागाचे विनायक जाधव, नामदेव घरत, भूमी अभियंता ज्ञानेश्वर भदे, विवेक कोळी, विठ्ठल देशमाने, देवानंद म्हात्रे, रमेश ठाकूर, अमोल सकपाळ, मनीषा जैन, रजनी पाटील, ज्योती सिंगासने, स्मिता जाधव व इतर कर्मचारी उपस्थित होते.









**पनवेल :** भाजप शहर अध्यक्ष तथा माजी नगरसेवक अनिल भगत यांनी माजी नगरसेवक मनोहर म्हात्रे, भाजप कार्यकर्ता यतीन मानकामे, रोहन भोईर आदींच्या गणपती बाप्पाचे दर्शन घेतले.












**पनवेल : माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या शिवाजीनगर येथील निवासस्थानी विराजमान बाप्पाचे दर्शन घेण्यासाठी भाविकांची रीघ लागली असून या ठिकाणी अयोध्येत साकरल्या जाणाऱ्या प्रभू श्रीरामांच्या मंदिराची प्रतिकृती भक्तांचे लक्ष आकर्षित करीत आहे. कोकण म्हाडाचे माजी सभापती व भाजपचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब पाटील, माजी पं. स. सदस्य निलेश पाटील, युवा नेते निलेश खारकर, ओबीसी सेलचे जिल्हा सरचिटणीस दशरथ म्हात्रे, सामाजिक कार्यकर्त्या सीमा घरत आदींनी शिवाजीनगर येथे भेट देत गणरायाचे दर्शन घेतले.** (छाया : अक्षय शार्दुल)


सतिश उगले, कळंबोली


शंकरशेठ वाडकर, नवीन पनवेल


मयुर कदम, नवीन पनवेल


महेश आणि पंकज काळे, पनवेल


माजी सरपंच रामचंद्र बाबू माळी वावेघर यांच्या घरी गौरी-गणपती


उरण : पाले येथील रूचिता म्हात्रे, श्रीया म्हात्रे यांच्या घरातील गौरी.


पनवेल : लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या शिवाजीनगर येथील विराजमान गणरायाचे भाजप जिल्हा उपाध्यक्ष निळकंठ घरत, जासई विभाग अध्यक्ष गोपीनाथ म्हात्रे आणि पत्रकार सुनील ठाकूर यांनी दर्शन घेतले.


पराग घरत, डोंगरी, उरण


अस्मित ठाकूर, चिरनेर, उरण


भाजप कार्यकर्ते दत्तूराम भोईर, उचेडे, पेण


आदर्श सोसायटीचा गणराया, सेक्टर ७, नवीन पनवेल


धनाजी साळुंखे, खांदा कॉलनी यांच्या घरातील. श्रीगणेश


बळीराम म्हात्रे, नवीन पनवेल





**पनवेल :** रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक, थोर शिक्षणमहर्षी पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या शहरातील पुतळ्याला ‘रयत’चे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, ‘रयत’चे जनरल बॉडी सदस्य अरुणशेठ भगत, माजी नगरसेवक बबन मुकादम, प्राचार्य गणेश ठाकूर आदी उपस्थित होते. सर्वांनी कर्मवीरांना विनम्र अभिवादन केले.

# डिंपल 'बॉबी' पन्नाशीची, वाटचाल वळणावळणाची

आपल्या संपूर्ण कारकिर्दीत डिंपल कापडियाने एकमेव 'बॉबी' साकारली असती तरी रसिकांच्या किमान चार पिढ्यांनी तिला दाद दिली असती आणि 'फिल्म दीवाना' म्हणून त्यात मीही असतो. पहिल्याच चित्रपटात तिला पाहिलं नि आत्मविश्वास, धीटपणा आणि नैसर्गिक अभिनय यांच्या झक्कास केमिस्ट्रीचा जबरदस्त स्क्रीन प्रेझेंन्स काय असतो हे पाहतच राहिलो. मनावर ते कायमचे कोरलेही गेले.





'बॉबी' म्हणताच राज कपूरचा 'तरुण चित्रपट', ऋषी कपूर व डिंपल कापडिया यांचा उत्कट भावना व्यक्त होणारा प्रणय असं म्हणता म्हणता 'मुझे कुछ कहना है' असं एकमेकांना सांगत सांगत धाडसी प्रेमात मुरलेली प्रेमकथा आणि त्यात आठ सुपर हिट गाण्यांची झक्कास, श्रवणीय, कम्माल दृश्य सौंदर्य असलेली फोडणी. राज कपूरमधला रोमॅन्टीक नायक त्याच्या दिग्दर्शनात, संकलनात, कलाकार निवडण्यात (खासकरून नायिका म्हणजेच प्रेयसीची फरफेक्ट निवड), त्याच्या फिल्मच्या पोस्टरमध्येही 'दिग्दर्शक' दिसे. 'चोवीस तास' चित्रपट या माध्यम व व्यवसायाचा विचार करणारा अथवा 'चित्रपट हाच आपला श्वास मानणारा' राज कपूरचा 'बॉबी' प्रदर्शित होऊन पन्नास वर्ष पूर्ण झालीदेखील तरी हा चित्रपट आजच्याच पिढीचा वाटतोय. २८ सप्टेंबर १९७३ रोजी दक्षिण मुंबईतील मेट्रो थिएटरमध्ये भव्य दिमाखदार प्रिमियरसह 'बॉबी' झळकला आणि पब्लिकने असा काही डोक्यावर घेतला की वातावरण रोमॅन्टीक झाले. राज कपूरने आपला मुलगा ऋषी कपूर याला 'हिरो' म्हणून चित्रपटसृष्टीत आणण्यासाठी 'बॉबी'ची निर्मिती केली असं या पिक्चरच्या मुहूर्तापासून वाटत होते. पिक्चर रिलीज होताच 'बॉबी' युवकाचे नव्हे; तर युवतीचे नाव आहे हे चित्रपट समीक्षक, प्रेक्षक आणि चित्रपटसृष्टीला समजले आणि डिंपल कापडिया स्टार झाली. 'बॉबी' ब्रेगन्झा म्हणून डिंपलचं रूपेरी पडद्यावरच थटणं कौतुकाचे आणि आकर्षणाचे. पन्नास वर्षांपूर्वीची सामाजिक सांस्कृतिक कौटुंबिक वातावरण पाहता डिंपलची वेशभूषा, केशभूषा फारच धाडसी होती. बिनधास्त पण ग्रेसफूल. कुठेही अश्लील नाही. बिकिनीत असो वा शॉर्ट फ्रॉकमध्ये ती सहज वावरलीय. राज कपूरचा दिग्दर्शनीय टच यातही दिसला. 'बॉबी'भोवती ही गोष्ट आहे हे के.ए.अब्बास यांच्या कथेत, वसंत साठेसाहेब व के.ए.अब्बास यांची पटकथा आणि डिंपल यांनी पुरते भाव व भान ठेवले म्हणायचं. 'बॉबी'चं दिसणं, पाहणं, नाचणं, हसणं, बोलकी नजर हे डिंपलने असं काही साकारलं की राजा (ऋषी कपूर) तिला पाहताच प्रेमात पडला आणि 'प्यार का नाम मैने सुनाता मगर प्यार क्या है यह मुझको नहीं थी खबर' याची कबुलीच त्याने नकळतपणे दिली. आणि बॉबीनेही त्याच्या प्रेमाचा स्वीकार करीत'... और चाबी खो जाए, हम तुम एक कमरे मे बंद हो' असा तेवढाच मोकळाढाकळा प्रतिसाद दिला.

पिक्चरची गीते (आनंद बक्षी, विठ्ठलभाई पटेल आणि इंद्रजितसिंग तुलसी) व संगीत (लक्ष्मीकांत प्यारेलाल) ही म्युझिक पीससह गाजली. गुणगुणली जाऊ लागली. त्या काळात चित्रपट प्रदर्शित होण्याच्या चार सहा महिने तबकडी म्युझिक मार्केटमध्ये येई.

'बॉबी'ची हवा येऊ लागली. गॉसिप्स मॅगझिनमधून ऋषी कपूर व डिंपलची दोस्ती वाढतयं अशा स्टोरीज रंगू लागल्या. डिंपलचं काम झक्कास होतेय अशी चित्रपटसृष्टीत कुजबूज वाढत जाताना तिने शशी कपूरसोबतचे प्रयाग राज दिग्दर्शित 'पाप और पुण्य' आणि 'इन्सानियत' हे दोन चित्रपट साईन केले. मनमोहन देसाई 'रोटी'साठी राजेश खन्नाची नायिका म्हणून डिंपलचा विचार करताहेत अशाही बातम्या आल्या. एकूण काय तर डिंपल कापडियाच्या रूपाने 'न्यू स्टार इज बॉर्न' असे वातावरण असतानाच जबरदस्त ब्रेकिंग न्यूज आली, सुपर स्टार राजेश खन्ना व डिंपल यांचे लग्न... राजेश खन्नाच्या फोटोशी लग्न करणाऱ्या अनेक युवती होत्या. काहीजणींनी त्याला रक्ताने पत्र लिहून आपले प्रेम व्यक्त केले. तोही अंजू महेंद्रुचा खास मित्र म्हणून चर्चेत होता. असं सगळं असतानाच कहानी मे ट्वीस्ट. अजून 'बॉबी'चं काही शूटिंग शिल्लक होतं. आता राज कपूरला म्हणे राजेश खन्नाला भेटून डिंपलच्या तारखा घ्याव्या लागल्या. लग्न होताच डिंपलने 'चित्रपटसृष्टी सोडून संसारात रमणार' अशी घोषणा केली. आता ती वांद्र्याच्या कार्टर रोडवरील आशीर्वाद बंगल्याची मालकीण होती. तिने सायनिंग अमाऊंड परत करीत 'पाप और पुण्य' (त्यात शर्मिला टागोर आली) आणि 'इन्सानियत' (त्यात मधु नावाची नवतारका आली.) हे चित्रपट सोडले.

पहिलाच पिक्चर सुपर हिट आणि डिंपलचं प्रसन्न व्यक्तिमत्त्व, आत्मविश्वास, अभिनय व स्क्रीन प्रेझेन्स हेही आवडलेले तरी तिने सुपर स्टारच्या पत्नीची भूमिका, जबाबदारी, मग काही वर्षांच्या अंतराने प्रथम ट्वींकल आणि मग रिंकी या दोन मुलींना जन्म देत संसारात रमण्याला पसंदी दिली. अधूनमधून ती राजेश खन्नासोबत एखाद्या









फिल्मी इव्हेन्टसला येई, एखाद्या गॉसिप्स मॅगझिनच्या कव्हरवर या कुटुंबाचे फोटो सेशन दिसे. एखादं गॉसिप्सही असे.

...आणि अशातच राजेश खन्ना व डिंपलमध्ये अजिबात पटत नाही, सारखी भांडणं होतात, आदळआपट होतेय, आताच्या आपल्या पडत्या काळाचा राग राजेश खन्ना डिंपलवर काढतोय यावर गॉसिप्स मॅगझिनमधून केवढं तरी गरमागरम, खारट तिखट लिहून येऊ लागले आणि एके दिवशी ब्रेकिंग न्यूज आलीच, डिंपल आपल्या दोन्ही मुलींना घेऊन आशीर्वाद बंगल्याबाहेर पडलीय आणि आपले पिता चुन्नीलाल कापडिया यांच्या जुहूतील समुद्र महल या बंगल्यात राहू लागलीय.

'ती पुन्हा अभिनय क्षेत्रात येतेय' ही बातमी भारी होती. अनेक निर्माता व दिग्दर्शकांची ती सदिच्छा भेट घेऊ लागली. कोणी 'मिलते रहो. जब हमारी नयी फिल्म बनेंगी सोचेंगे' असं फिल्मी रिवाजानुसार म्हटलं. राज कपूर तेव्हा 'राम तेरी गंगा मैली'साठी नायिकेच्या शोधात होते. डिंपलने ग्रामीण युवतीच्या रूपात आर.के. स्टुडिओतील ऑफिसमध्ये राज कपूरची भेट घेतली (सिद्धार्थ काकच्या राज कपूरवरच्या डॉक्युमेंटरीत ही भेट पहायला मिळते.) रमेश सिप्पीने डिंपलला 'सागर' (१९८५) या प्रेम त्रिकोणाच्या गोष्टीत ऋषी कपूर व कमल हसन यांची नायिका म्हणून निवडले. चित्रपटाच्या प्रगतीचा वेग धीमा होता (तो का ही वेगळीच गोष्ट) तोपर्यंत डिंपलने आणखी काही चित्रपट स्वीकारले.

'बॉबी'(१९७३)नंतर बारा वर्षांनी 'सागर' (१९८५)पासून डिंपल पुन्हा आली. रसिकांची, नायकांची, अभिनेत्रींची नवीन पिढी आली होती, पण आपलं टॅलेंट, क्षमता, सहकार्याची भावना यातून तिने पुन्हा जम बसवला.

**झूम प्रहर**



**दिलीप ठाकूर**
चित्रपट समीक्षक

डिंपलला मुलाखती देण्यात विशेष रस नसे. सहज संवाद साधला तर ती बोलायची असा चक्क तीनदा अनुभव घेतला. दिग्दर्शक राजकुमार कोहली यांनी तिचा ८ जून हा वाढदिवस मेहबूब स्टुडिओत 'बीस साल बाद' या चित्रपटाच्या सेटवर करताना आम्हा काही निवडक सिनेपत्रकारांना आमंत्रित केले. लंच ब्रेकमध्ये सेटवर भला मोठा केक आला. मिथुन चक्रवर्ती व मीनाक्षी शेषाद्री यांनीही सहभाग घेतला. आम्हा सिनेपत्रकारांच्या शुभेच्छा स्वीकारत काही गप्पाही केल्या, पण मुलाखत आज नको असं मराठीत बोलली. तिला छान मराठी येत असे. असाच अनुभव एन. चंद्रा दिग्दर्शित 'नरसिंह' (१९९२) च्या नाशिक येथील आऊटडोअर्स लोकेशन शूटिंग रिपोर्टींगच्या वेळीही आला. आता मुलाखत नको अशी तिची विनंती आजही ठळकपणे लक्षात आहे. रमेश साळगावकर दिग्दर्शित 'सह्याद्रीचा सिंह' या चित्रपटाचा जुहूतील एका पंचतारांकित हॉटेलमधील मुहूर्तालाही ती विशेष आमंत्रित होती. हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या हस्ते हा मुहूर्त झाला. डिंपल अतिशय उत्साहात होती, पण तेव्हाही आज मुलाखत नको म्हणाली. फोटो सेशनलाही ती खूपच उशिरा होकार देई.

एकदा आम्हा सिनेपत्रकारांना आश्चर्याचा धक्काच बसला. फिल्मीस्तान स्टुडिओत आम्ही सिनेपत्रकार बी.आर.चोप्रा दिग्दर्शित 'आवाम'च्या सेटवर लंच ब्रेकमध्ये सेटवरच एका टेबलावर जेवत असतानाच जवळच्याच टेबलावर राजेश खन्ना शफी इनामदारसोबत जेवत होता आणि अशातच शेजारच्याच नितीन मनमोहन निर्मित व मुकुल आनंद दिग्दर्शित 'इन्साफ'च्या सेटवरील डिंपल आली आणि सगळ्यांचीच तारांबळ उडाली. त्या दिवसांत ते दोघे वेगळे राहत होते अशा वेळी स्टार पती पत्नीची भेट हा धक्काच. डोळ्यांवर विश्वास बसू नये अशी गोष्ट. फोटोग्राफर्सची हा एक्स्युझिव्हज क्षण टिपण्याची घाई झाली. शफी इनामदार उष्ट्या हाताने उभा राहिल्याचे फोटोत आले. या भेटीच्या फोटोला प्रत्येक फोटोग्राफरला चांगली किंमत मिळाली. याला 'फोटो स्टोरी' म्हणतात. खूपच गाजला हा फोटो.

१९८८च्या सुरुवातीलाच एक आमंत्रण हाती येताच आश्चर्य वाटले. राजेश खन्ना निर्मित व एस.व्ही.चंद्रशेखर दिग्दर्शित 'जय शिव शंकर' या चित्रपटाचा गोरेगावातील दादासाहेब फाळके चित्रनगरीत मुहूर्त आहे. नायिका डिंपल खन्ना. म्हणजे या चित्रपटात राजेश खन्ना व डिंपल नायक नायिका. मला आजही आठवतेय चित्रनगरीतील देवळात हा मुहूर्त झाल्यावर हे दोघेही आम्ही सिनेपत्रकार व पाहुण्यांना आवर्जून भेटले. दुर्दैवाने हा चित्रपट प्रदर्शित झाला नाही.

डिंपलची 'सेकंड इनिंग' अशी झक्कास रंगली. अमिताभ बच्चनची नायिका होण्याचं तिचं स्वप्न शशी कपूर दिग्दर्शित 'अजूबा'ने पूर्ण केले, पण हा फॅण्टसी चित्रपट फसला.

डिंपलने दिग्दर्शक गुलजार (लेकिन)पासून गोविंद निहलानीपर्यंत (दृष्टी) आणि सुभाष घईपासून (राम लखन) फिरोझ खानपर्यंत (जांबाझ) अनेक पठडीतील दिग्दर्शकांच्या चित्रपटात भूमिका साकारत वाटचाल केली. छान बिझी राहिली. कालांतराने दिल चाहता है, लक बाय चान्स इत्यादी चित्रपटातून भूमिका साकारल्या...

डिंपलचं प्रगती पुस्तक लक्षवेधक आहे. आज ती आरवकुमार आणि नाओमिका यांची आजी आहे. अक्षयकुमार जावई आहे. दुसरा जावई दिल्लीत उद्योगपती आहे. या प्रवासात पती राजेश खन्ना, बहीण सिंपल कापडिया यांचे निधन झालेय. राजेश खन्नाच्या (१८ जुलै २०१२) अंत्ययात्रेतील डिंपलचा उदास चेहरा, हरवलेली नजर हे 'बॉबी'चं दुसरं टोक होते... तेही माझ्या मनात ठसलयं. चित्रपटसृष्टीतील भटकंतीत असाही एक अनुभव.

डिंपल कापडियाची खन्ना ती अनपेक्षित झाली आणि अनेक वळणे घेत घेत तिचा पुढचा प्रवास सुरु आहे. त्यात 'बॉबी'चा ठसा मात्र पन्नास वर्षांनंतरही कायम आहे. काही चित्रपट कायमच पडद्यावर सुरू आहेत असं वाटतं. त्यात 'बॉबी' आहे आणि त्यातील डिंपलही आहे.

# अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या योजनांचा सुशिक्षित बेरोजगार तरुणांना आधार

शासनाच्या विविध योजना सामान्य नागरिकांपर्यंत पोहचविण्यासाठी व त्यांना या योजनांचा लाभ देण्यासाठी शासनामार्फत विविध योजना राबविण्यात येत असतात. अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ मराठा समाजातील सुशिक्षित बेरोजगार तरुणांना रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याकरिता वैयक्तीक कर्ज व्याज परतावा योजना व गट प्रकल्प कर्ज व्याज परतावा योजना राबवित आहे.

**वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना**

या योजनेची मर्यादा १० लाख रूपयांवरून १५ लाख रूपयांपर्यंत वाढविण्यात आली असून महामंडळामार्फत चार लाख ५० हजार रुपये व्याज मर्यादेत परतावा करण्यात येतो. हा व्याज परतावा कालावधी जास्तीत जास्त सात वर्षे व व्याजाचा दर जास्तीत जास्त द.सा.द.शे. १२ टक्के आहे. या योजनेंतर्गत लाभार्थ्यांनी मात्र बँकेमार्फत कर्ज घेतलेले असावे व ते फक्त व्यवसायिक तथा उद्योगाच्या दृष्टीने मंजूर झालेले असावे.

**गट प्रकल्प कर्ज व्याज परतावा योजना**

या योजनेंतर्गत किमान दोन किंवा दोनपेक्षा अधिक व्यक्तींच्या गटाने एकत्र येऊन दोन व्यक्तींसाठी कमाल २५ लाख रुपये मर्यादेवर, तीन व्यक्तींसाठी ३५ लाख रुपयांच्या मर्यादेवर, चार व्यक्तींसाठी ४५ लाख रुपयांच्या मर्यादेवर व पाच व पाचपेक्षा अधिक व्यक्ती असल्यास ५० लाख रुपयेपर्यंतच्या व्यवसाय/उद्योग कर्जावर पाच वर्षांपर्यंत अथवा कर्ज कालावधी यापैकी जे कमी असेल ते जास्तीत जास्त १२ टक्के व्याज किंवा १५ लाख रुपयांच्या मर्यादेत कर्ज मंजूर केलेल्या गटाने वेळेत कर्जाचे हप्ते भरल्यास हप्त्यातील व्याजाची रक्कम गटाच्या बँक खात्यात दरमहा महामंडळामार्फत जमा करण्यात येते. या योजनेमध्ये पीएफओ गटांनी त्यांच्या शेतीपूरक व्यवसायाकरीता बँकेमार्फत घेतलेल्या कर्जावरीलदेखील व्याज परतावा नियमानुसार महामंडळ करेल.

महामंडळाच्या योजनांची संपूर्ण यंत्रणा व कार्यपद्धती ही ऑनलाईन असून पूर्णपणे पारदर्शक आहे. ही योजना लाभार्थीभिमुख असून लाभार्थी जोपर्यंत सर्व माहिती वेब प्रणालीवर www.udyog.mahaswayam.gov.in अपलोड करीत नाही तोपर्यंत पुढील कार्यवाही करता येत नाही.

**महामंडळाच्या योजनांकरीता सामाईक अटी व शर्ती**

उमेदवार महाराष्ट्राचा रहिवासी असणे अनिवार्य आहे. या योजना प्रामुख्याने मराठा प्रवर्गाकरीता तथा ज्या प्रवर्गाकरिता स्वतंत्र महामंडळ अस्तित्वात नाही अशांसाठी आहेत. योजनेकरिताची वयोमर्यादेची अट स्त्री-पुरुषांसाठी कमाल ६० वर्षे आहे. लाभार्थीचे कौटुंबिक वार्षिक उत्पन्न आठ लाख रुपयांच्या आत असावे (आठ लाखाच्या मर्यादेत असल्याचे तहसिलदारांचे प्रमाणपत्र) किंवा वैयक्तीक आयटीआर (पती व पत्नीचे). लाभार्थीने महाराष्ट्राच्या भौगोलिक क्षेत्रात स्थायिक/कार्यरत असलेल्या बँकेकडून कर्ज घेणे अनिवार्य असेल. दिव्यांग व्यक्तीला योजनेंतर्गत लाभ घ्यावयाचा असल्यास तो मानसिकदृष्ट्या सक्षम असावा. गट कर्ज व्याज परतावा योजना (IR-II) मध्ये कमाल वयोमर्यादेचे बंधन नसेल. गट कर्ज व्याज परतावा योजना (IR-II) अंतर्गत (i) भागीदारी संस्था (ii) सहकारी संस्था (iii) बचत गट, (iv) एल.एल.पी. (v) कंपनी कायद्याअंतर्गत नोंदणीकृत संस्था व इतर शासन नोंदणीकृत गट/संस्था लाभास पात्र असतील. महामंडळाच्या योजनांतर्गत फक्त व्यवसाय/उद्योगाकरिता घेतलेल्या कर्जावरील व्याज परतावा करण्यात येईल व या योजनांची अंमलबजावणी तंतोतंत शासन निर्णय २१ नोव्हेंबर २०१७ नुसार करण्यात येईल.




**योजनांचा लाभ घेण्यासाठी कार्यपद्धती**

पात्रता प्रमाणपत्र (LOI) करिता महत्त्वाची कागदपत्रे - आधार कार्ड (अपडेटेड मोबाईल क्रमांक व स्वत:च्या ई-मेल आयडीसह), रहिवासी पुरावा (रहिवासी दाखला/लाईट बिल/रेशनकार्ड/गॅस बिल/बँक पास बुक), उत्पन्नाचा पुरावा (उत्पनाचा दाखला/आयटी रिटर्न (जर लग्न झाले असल्यास नवरा-बायकोचे व लग्न झाले नसल्यास स्वत:चे आयटी रिटर्न अनिवार्य), जातीचा दाखला किंवा शाळा सोडल्याचा दाखला, एक पानी प्रकल्प अहवाल (नमुना वे प्रणालीवर उपलब्ध आहे).

पात्रता प्रमाणपत्र (LOI) प्राप्त झाल्यानंतरच, LOI समवेत लाभार्थ्याने त्याला करावयाचा असलेल्या व्यवसायाचा/उद्योगाचा प्रकल्प अहवाल (आवश्यक ते सर्व कागदपत्र) घेऊन त्यांच्या कार्यक्षेत्रातील कोणत्याही बँकेमध्ये कर्ज प्रकरण दाखल करावे. कर्ज मंजुरीची पूर्ण प्रक्रिया बँक त्यांच्या नियमानुसार करीत असते. यामध्ये महामंडळ कोणत्याही स्वरूपाचा हस्तक्षेप करीत नाही. कर्ज प्रकरण दाखल केल्यानंतर पोचपावती बँकेकडून घ्यावी.

बँकेने कर्ज मंजूर केल्यानंतर कर्ज मंजूरीबाबतची आवश्यक सर्व माहिती संबंधिताने वेब प्रणालीवर सादर करावी (उदा. ज्या खात्यामध्ये व्याज परतावा हवा आहे त्याचा तपशील, बँक कर्ज मंजुरी पत्र, बँकेमार्फत वितरीत करण्यात आलेल्या कर्जाचा पुरावा (बँक स्टेटमेंट), बँक एचख वेळापत्रक (त्यावर वसुलीचा दिनांक असणे अनिवार्य), प्रकल्प अहवाल, हफ्ता भरल्याबाबतचा पुरावा (बँक स्टेटमेंट सही व शिक्यानिशी). त्यानंतर बँकेमध्ये पूर्ण एचख हफ्ता विहीत कालमर्यादेत भरल्यानंतरच महामंडळाच्या वेब प्रणालीवर ऑनलाईन क्लेम दाखल करावा. दाखल केलेला क्लेम अचूक असला तरच संबंधिताला व्याज परताव्याचा लाभ देता येईल. यमाध्ये हफ्ता भरल्याबाबतचा पुरावा म्हणून बँक स्टेटमेंट सही व शिक्क्यानिशी अपलोड करणे अनिवार्य असेल. लाभार्थ्याने दाखल केलेल्या क्लेमची पडताळणी महामंडळामार्फत करण्यात येऊन लाभार्थ्यास अनुज्ञेय असलेली व्याज परताव्याची रक्कम संबंधिताच्या बँक खात्यात ऑनलाईन स्वरूपात वितरीत करण्यात येईल.

या योजनांच्या लाभाकरिता कोणत्याही सहकार्याची आवश्यकता असल्यास महामंडळाच्या जिल्हा कार्यालयाशी संपर्क साधावा. पत्ता असा आहे जिल्हा समन्वयक,अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ, रायगड-अलिबाग.

संपर्क वेब प्रणालीवर उपलब्ध करून देण्यात आला आहे. या योजनांच्या सहाय्याकरिता महामंडळाचे मुंबई मुख्यालय व जिल्हानिहाय जिल्हा समन्वयकांच्या व्यतिरिक्त इतर कोणतीही यंत्रणा उपलब्ध नाही. त्यामुळे कोणत्याही खासगी व्यक्ती/संस्थेच्या प्रलोभनाला बळी पडू नये, असे आवाहन महामंडळामार्फत करण्यात आले आहे.

**-रायगड जिल्हा माहिती कार्यालय**

# निजामपूरमध्ये विकासकामांचा शुभारंभ

## भरभरून विकासकामे करणार –आमदार गोगावले



**माणगाव : प्रतिनिधी**

निजामपूर विभागातील एकही गाव, वाडी, वस्ती विकासकामांपासून वंचित राहणार नाही. आपण गावकरी जी जी कामे सुचवाल ती सर्व कामे टप्प्याटप्याने मार्गी लावून भरभरून विकासकामे करून निजामपूर विभागाचा कायापालट करणार अशी ग्वाही महाड, पोलादपूर, माणगाव विधानसभा मतदार संघाचे आमदार भरत गोगावले यांनी निजामपूर विभागातील विविध विकासकामांच्या शुभारंभावेळी बोलताना दिली.

आमदार गोगावले यांच्या प्रयत्नाने मंजूर झालेल्या निजामपूर विभागातील विविध विकासकामांचा भूमिपूजन व उदघाटन समारंभ गुरुवारी (दि. २१) शिवसेना उपनेते पक्षप्रतोद तथा आमदार भरत गोगावले यांच्या हस्ते व मागाठाणेचे आमदार प्रकाश सुर्वे व निजामपूर ग्रामपंचायतीचे सरपंच राजाभाऊ रणपिसे यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. त्यानंतर कोस्ते बुद्रुक येथील सभागृहात सभा व सत्कार झाला.

या कार्यक्रमास शिवसेना शिंदे गट जिल्हाप्रमुख प्रमोद घोसाळकर, जिल्हा युवासेना प्रमुख विपुल उभारे, उपजिल्हा प्रमुख अविनाश नलावडे, तालुका प्रमुख अँन्ड. महेंद्र मानकर, उपतालुका प्रमुख नितीन पवार, संपर्क प्रमुख चंद्रकांत जोरकर, गणेश समेळ माजी पंचायत समिती सदस्य सुधीर पवार, निजामपूर ग्रामपंचायत सदस्य प्रसाद गुरव, महिला संपर्क प्रमुख गुलाब पवार, तालुका युवासेना प्रमुख राजेश कदम, विभाग प्रमुख मनोज सावंत, युवासेना विभाग प्रमुख सचिन मोरे, निजामपूर ग्रामपंचायतीचे सदस्य, सदस्या, कार्यकर्ते, निजामपूर विभागातील ग्रामस्थ, मुंबईकर मंडळ आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या वेळी मार्गदर्शन करताना आ. भरतशेठ गोगावले पुढे म्हणाले कि, गेली मीन वेळा या मतदार संघातील ग्रामस्थांनी मला भरभरून प्रेम देत विधानसभेवर निवडून पाठवले याची जाणीव व आठवण माझ्यासारख्या कार्यकर्त्याला निश्चितपणे आहे. या विभागातील एकही गाव, वाडी, वस्ती विकासकामांपासून वंचित राहणार नाही. आपण गावकरी जी जी कामे सुचवाल ती सर्व कामे टप्प्याटप्याने मार्गी लावून भरभरून विकासकामे करून निजामपूर विभागाचा कायापालट करणार आहे.

### ▮ या कामांचे झाले भूमिपूजन

*आमदार भरतशेठ गोगावले यांच्याहस्ते निजामपूर विभागातील चांदे आदिवासीवाडी (एकलव्य नगर) रस्ता दंबरीकारां करणे, अबडुंगी येथे स्मशानभूमी चौथरा व शेडचे भूमिपूजन, कुंभार्ते आदिवासीवाडी येथे रस्त्याचे भूमिपूजन, कुंभार्ते स्मशानभूमीकडे जाणाऱ्या रस्त्याचे भूमिपूजन, पाणस्पे गावातील अंतर्गत रस्त्याचे उदघाटन सोहळा, मांडवकरवाडी जाणारा रस्त्याचे भूमिपूजन सोहळा, निजामपूर नावेनगर अंतर्गत रस्ता काँक्रेटीकरण भूमिपूजन सोहळा, फणसवाडी अंतर्गत भूमिपुजन सोहळा अंतर्गत रस्त्याचे भूमिपूजन सोहळा, कावडेवाडी स्मशानभूमी रस्त्याचे भुमीपुजन सोहळा कोस्ते बु. आदिवासीवाडी येथे सभागृह व नळ पाणी पुरवठा योजनेचे उदघाटन करणे, कोस्ते बु. बौद्धवाडी येथील रस्त्याचे भूमिपूजन करणे, कोस्ते बु.स्मशानभूमी नूतनीकरण करणाचे उदघाटन करणे, कोस्ते बु.स्मशानभूमी नूतनीकरण करणाचे उदघाटन करणे, कोस्ते बु. सामाजिक सभागृहाचे उदघाटन राणे व मौजे कोस्ते बु. येथे आ. भरतशेठ गोगावले यांची जाहीर सभा व सत्कार समारंभ करणे आदी विकासकामांचा शुभारंभ करण्यात आला.*

या वेळी बोलताना आमदार प्रकाश सुर्वे म्हणाले की, आज एका दिवसात त्यांनी निजामपूर विभागातील साडेतीन कोटी रुपयांच्या विकासकामांचा शुभारंभ केला. निजामपूरचे सरपंच राजाभाऊ रणपिसे यांनी म्हणाले, आमदार भरत गोगावले यांनी दीड महिन्यात निजामपूरच्या पिण्याच्या शुद्ध पाण्यासाठी २१ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला.

# रोह्यात मुसळधार पाऊस; भातशेतीला पोषक वातावरण

**रोहे : प्रतिनिधी**

आठवडा पासून रोहा मध्ये पावसाने मुक्काम ठोकला आहे. शुक्रवारी सायंकाळी रोहा शहरासह ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात पाऊस पडला आहे. शुक्रवारी सायंकाळी पाऊस पडल्याने डोंगर माथ्यावरून येणारे नदी, नाले, ओढे भरून वाहत होते. शनिवारी सकाळपासूनच पावसाने जोरदार हजेरी लावली आहे. रोहा शहरासह ग्रामीण भागात मुसळधार पाऊस पडत आहे. हा पाऊस भात शेतीला पोषक असल्याचे शेतकऱ्यांकडून बोलले जात आहे. संपूर्ण वातावरण ढगाळ व पाऊस झाले होते.

गणरायाच्या आगमनापासून पाऊस रोहा शहरासह ग्रामीण भागात समाधानकारक पडला आहे. अधून मधून उन्ह तर काही वेळा मुसळधार पाऊस पडत होता. शुक्रवारपासून मात्र पावसाचा जोर कायम आहे. तो शनिवारी ही दिसून आला.

रोहा तालुक्यातील रोहा अष्टमी शहरासह तालुक्यातील मेढा, चणेरा, भालगाव, घोसाळे, धाटाव, कोलाड, सुतारवाडी, खांब, देवकाने, पिंगळसई, नागोठणे, वाकण आदी भागात शनीवारी सकाळपासुन पावसाने जोरदार हजेरी लावली आहे. मुसळधार पाऊस पडत असल्याने डोंगर माथ्यावरून नाले, ओढे भरून वाहत आहेत.

जोरदार पाऊस आल्याने रोहा बाजारपेठ येथील जनजीवन विस्कळीत झाल्याचे दिसून आले. दीड दिवसाच्या गणपती विसर्जनाला पावसाने जोरदार हजेरी लावली होती त्यानंतर आता पुन्हा एकदा पाच दिवसाच्या गणपती विसर्जनाला पावसाने जोरदार हजेरी लावली आहे.



# माणगावच्या निजामपूर येथील मुस्लिम बांधवांचा शिवसेनेत प्रवेश

**माणगाव : प्रतिनिधी**

शिवसेना शिंदे गटाचे उपनेते तथा पक्षप्रतोद आमदार भरतशेठ गोगावले यांच्या विकासकामांनी प्रभावित होऊन माणगाव तालुक्यातील निजामपूर येथील मुस्लिम बांधव राष्ट्रवादी काँग्रेसचे निजामपूर ग्रामपंचायतीचे माजी सरपंच हमजा जळगावकर यांच्यासह मोहल्ल्यातील ६० मुस्लिम बांधवांनी माणगाव शासकीय विश्रामगृह याठिकाणी शुक्रवारी (दि. २२) आमदार भरत गोगावले यांच्या उपस्थितीत शिवसेना शिंदे गटात जाहीर प्रवेश केला.

या वेळी हमजा जळगावकर, शब्बीर अखवारे, सिकंदर येशवीकर, सर्फराज जळगावकर, इम्रान लोखंडे, जुबेर लोखंडे, रियाज जळगावकर, शौकत जळगावकर, मुद्दशीर जळगावकर, आदिल जळगावकर, अजीम राऊत, इस्माईल राऊत, हुसेन मांडलेकर, हबिबुल्ला जळगावकर, सय्यद मांडलेकर, सहेबाज मांडलेकर, शकील लोखंडे, मुजम्मिल राऊत, जलील लोखंडे, रिहान मांडलेकर, सलमान परदेशी, आदम राऊत, जुनेद मांडलेकर यांच्यासह ६० सहकाऱ्यांनी शिवसेनेत प्रवेश केला.

या प्रक्षप्रवेश कार्यक्रमाला जिल्हा युवासेना प्रमुख विपुल उभारे, भावेश नाक्ते, माजी पंचायत समिती सदस्य सुधीर पवार, उपतालुका प्रमुख नितीन पवार, गणेश समेल, संजय गुळंबे, राजेश कदम यांच्यासह शिंदे गटाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## महाड एमआयडीसीमधील कंपनीत स्टील पाईपची चोरी

**महाड : प्रतिनिधी**

महाड एमआयडीसीमध्ये असलेल्या एका रासायनिक कंपनीमध्ये चोरी झाली असून कंपनीमधील स्टेनलेस स्टील चोरट्यांनी चोरून नेले आहे. याप्रकरणी महाड एमआयडीसी पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपीविरोधात गुन्हा दाखल झाला आहे.

महाड एमआयडीसीमधील न्युर्योन केमिकल या कंपनीत ९ सप्टेंबर २०२३ रोजी अज्ञात आरोपीने कंपनीमधील स्टेनलेस स्टील चोरून नेले आहे याप्रकरणी महाड एमआयडीसी पोलीस ठाण्यात दत्तात्रय परशुराम ठाकूर यांनी फिर्याद दाखल केली आहे. दिलेल्या फिर्यादीवरून महाड औद्योगिक पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपी प्रधान यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कंपनीत असलेले स्टेनलेस स्टील पाईप, साईड ग्लास, व्हॉल्व, असे एकूण ३१,८०० रुपये किमतीचे स्टेनलेस स्टील चोरट्याने लंपास केले आहे. महाड एमआयडीसी पोलीस ठाण्यामध्ये अज्ञात चोरट्या विरोधात भादवि कलम ३७९ प्रमाणे गुन्हा दाखल झाला आहे अधिक तपास चन्नप्पा रामचंद्र अंबरगे हे करत आहेत.

## बस आणि कारचालकामध्ये वाद; गुन्हा दाखल

**महाड :** महाड तालुक्यातील आंबिवली गावच्या हद्दीत एसटीमधील प्रवासी उतरत असताना समोरून आलेल्या कार चालकाने विनाकारण एसटी चालकाला शिवीगाळ करत केबिनमध्ये दगड फेकून मारला याप्रकरणी महाड तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झालेला आहे.




महाड एसटी आगाराचे चालक बाबासाहेब गोविंद राजेमहाडिक हे त्यांच्या ताब्यातील एसटी बस (१४ बीटी २५९८) ही सापे वामने मार्गे आंबिवली दिशेने घेऊन जात असताना आंबिवली येथे प्रवाशाला उतरण्यासाठी बस थांबवली होती. त्याच दरम्यान समोरून व्हॅगनार कार एम एच ०६ बी यु १७१० ही आली रस्ता अरुंद असल्याने कारचालकाने कार मागे घेतली. त्यामुळे कारचालकाला रस्ता करून देण्यासाठी बस चालकाने बस बाजूला घेतली, मात्र कारचालकाने बस चालकाच्या दरवाजा लगत कार लावून हातामध्ये लोखंडी रॉड घेऊन खाली उतरून बसवर जोराने मारू न सुरुवात केली. मोठ्याने आरडाओरडा करत केबिनमध्ये दगड फेकून मारली या प्रकरणी बस चालक बाबासाहेब राजे महाडिक यांनी महाड तालुका पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे त्यानुसार आरोपी कारचालक बिजगरचे तंटामुक्त अध्यक्ष पंढरीनाथ विठ्ठल बैकर यांच्याविरोधात गुन्हा दाखल झाला आहे. पोलीस अधिक तपास करत आहेत.

## पेणमधील धावटे आदिवासी वाडीत मागील भांडणाच्या रागातून कोयत्याने वार

**पेण : प्रतिनिधी**

पेणमधील धावटे आदिवासी वाडीवर मागच्या भांडणाचा राग धरून एकावर कोयत्याने वार केल्याची घटना घडली आहे.

याबाबत माहिती अशी कि, पेण पोलीस ठाणे हद्दीतील धावटे आदिवासींवडी येथे शुक्रवारी (दि. २२) समीर अविनाश वाघमारे (वय २१, रा.धावटे आदिवासीवाडी ता.पेण) हे त्यांचे चुलत काका यांच्या घरी बसण्यासाठी गेले असता आरोपी सुमित संतोष पवार (वय २२) याने मागील दोन दिवसांपुर्वी झालेल्या किरकोळ भांडणाचा राग मनात धरून फिर्यादी यांच्याशी पुन्हा बाचाबाची करून धक्काबुक्की केली व त्याबाबत फिर्यादी हे आरोपी संतोष विष्णू पवार यांना सांगण्यास गेले असता आरोपी क्र. १ व फिर्यादी यांच्यात धक्काबुक्की झाली. धरपकड सुरू असताना यातील आरोपी संतोष विष्णू पवार याने फिर्यादीचे दोन्ही हात पाठिमागे पकडून धरून ठेवले व आरोपी सुमित पवार याने कोयत्याचा वार फिर्यादीचे डोक्यात मारून फिर्यादीस जिवे ठार मारण्याचा प्रयत्न केला. या गुन्ह्यातील दोन आरोपींना २२ सप्टेंबर रोजी सायंकाळी ४:४२ च्या सुमारास अटक करण्यात आली आहे. याबाबत पेण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जखमी समीर वाघमारे पेण उपजिल्हा रुग्णालय पेण येथे उपचार घेत आहे.



वर्षा मनोहर पाटील, नवीन पोसरी, मोहोपाडा



वैभव रामचंद्र खराडे, मोहोपाडा



सुमित थळे, मुळेखंड, करंजा रोड, उरण



शशिकांत भुवड, देऊळवाडी, उरण



प्रशांत रमेश तांबोळी, मोहोपाडा




सार्वजनिक शिवराज मित्र मंडळ, मोहोपाडा पंचशिलनगर



सार्वजनिक आदर्श मित्र मंडळ, मोहोपाडा पंचशिलनगर



खालापूर : भाजप महिला मोर्चाच्या उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अश्विनी अशोक पाटील यांच्या खानाव येथील निवासस्थानी विराजमान गणपती.



भाजप माणगाव शहराध्यक्ष नितीन दसवते व माजी नगरसेविका स्नेहा दसवतेंचे गणपती दर्शन



ज्येष्ठ पत्रकार संजय भुवड, महाड



खोपोली : भाजप शहराध्यक्ष रमेश रेटरेकर यांच्या निवासस्थानी विराजमान गणेशाचे सरचिटणीस हेमंत नांदे, चिटणीस गोपाळ बावस्कर, राहुल जाधव व विकास खरपुडे आदींनी दर्शन घेतले.



भाजप महिला मोर्चाच्या माणगाव तालुकाध्यक्ष अश्विनी महाडिक यांनी गणरायाचे दर्शन घेतले.



उद्योजक राजू पिचिका, पेण

# चाकरमानी निघाले परतीच्या प्रवासाला

## मुंबई-गोवा महामार्गावर, रेल्वे प्रवाशांसाठी पोलीस यंत्रणा सज्ज

**रोहे : प्रतिनिधी**

गणेशोत्सवाच्या काळात मोठ्या प्रमाणात चाकरमानी व नोकरदार आपल्या गावी गणेशोत्सव साजरा करण्यासाठी आले होते. उत्साही वातावरणात कोकणात गणेशोत्सव साजरा झाला असून पाच दिवसाच्या गणपतीचे विसर्जन झाल्यानंतर चाकरमन्यांचा परतीचा प्रवास सुरू झाला आहे. मुंबई, पुणे, ठाणे यासह राज्यातून व राज्याबाहेरून आलेल्या चाकरमान्यांनी गावाहुन पुन्हा आपल्या कामाच्या ठिकाणी, आपण राहत असलेल्या ठिकाणी जाण्यासाठी लगबग सुरु केली आहे. त्यासाठी पोलीस प्रशासन सज्ज झाले आहे.



रायगडचे अप्पर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे-पाटील व वाहतूक पोलीस निरीक्षक अनिल लाड यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल ते कशेडी घाटपर्यंत वाहतूक पोलीस वाहतूक सुरळीत करण्यासाठी सज्ज आहेत. परतीच्या प्रवासासाठी गणेशभक्तांना कोणतीही असुविधा होऊ नये यासाठी ते कार्यमग्न आहेत. पनवेल ते कशेडी घाटापर्यंत ३५ अधिकारी व २४६ पोलीस कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत.

चाकरमानी पुन्हा आपल्या कामाच्या ठिकाणी जाण्यासाठी रेल्वे, एसटी बस, खासगी बस यासह आपल्या चार चाकी वाहनांचा उपयोग करीत असल्याने रोहा तालुक्यातील मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग, मुरुड-रोहा-कोलाड-ताम्हाणे मार्गे पुणे, मुरूड-रोहा-वाकण-खोपोलीमार्गे पुणे, रोहा-नागोठणेमार्गे मुंबई व रोहा अलिबाग हा मार्ग गजबजलेला असतो. त्यामुळे वाहतूक सरळीत राहण्यासाठी पोलीस यंत्रणा कार्यान्वित आहे.

रोहा पोलीस उपविभागीय अधिकारी सोनाली कदम यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी चांगल्या पद्धतीने गणेशोत्सव काळात काम केले आहे. मुंबई गोवा-महामार्गावर नागोठणे व कोलाड पोलीस ठाणे, तर अंतर्गत रस्त्यावर रोहा पोलीस ठाणे पूर्ण क्षमतेने काम करताना दिसले. काही अपवाद वगळता धीम्या गतीने का होईना मुंबई- गोवा महामार्गावर वाहतूक सुरळीत होती. पोलीस यंत्रणा व वाहतूक पोलीस यांनी २४ तास सेवा देत वाहतूक सुरळीत ठेवली आहे. आता चाकरमान्यांच्या परतीच्या सुखकार प्रवासासाठी पोलीस यंत्रणा सज्ज झाली आहे.

चाकरमान्यांना सगळ्यात सुरक्षित, कमी खर्चिक व लवकर असा प्रवास असलेला रेल्वे प्रवास गणेशोत्सवाच्या सुरुवातीच्या वेळी उशिराने होत होता, परंतु रोहा ते सोमाटणे या रेल्वे स्टेशनदरम्यान रेल्वे पोलिसांनी चांगली भूमिका बजावली आहे. रेल्वे पोलीस निरीक्षक राजेंद्र जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली तीन अधिकारी व ४२ रेल्वे पोलीस तैनात आहेत. रेल्वे पोलिसांनी रोहा, निडी, नागोठणे, कासू, पेण, हमरापुर, जिते, आपटा, रसायनी, सोमाटणे या रेल्वे स्थानकांतील प्रवाशांची व सुरक्षित प्रवासाची जबाबदारी चोख बजावली आहे.

रोहा पोलीस उपाधीक्षक सोनाली कदम यांच्या मार्गदर्शनाखाली परतीच्या प्रवासासाठी महामार्गावर, अंतर्गत राज्यमार्गावर, जिल्हा मार्गावर पोलीस तैनात आहेत.

रोहा पोलीस निरीक्षक प्रमोद बाबर यांच्यासह चार अधिकारी ४८ कर्मचारी प्रशिक्षणार्थी १० व १० होमगार्ड गणेशोत्सवाच्या काळात रोहा हद्दीत तैनात आहेत. कोलाड हद्दीत पोलीस निरीक्षक अजित साबळे यांच्यासह दोन अधिकारी व ३५ कर्मचारी आणि नागोठणे हद्दीत पोलीस निरीक्षक संदीप पोमण यांच्यासह चार अधिकारी, २६ कर्मचारी व सात होमगार्ड तैनात आहेत.

# नेरळजवळ इको कारची रिक्षाला जोरदार धडक

## चिमुकलीचा मृत्यू, लहान मुलगा अत्यवस्थ



**कर्जत : प्रतिनिधी**

नेरळ-कल्याण राज्यमार्ग रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या प्रवासी रिक्षाला इको कारने धडक दिल्याची घटना गुरुवारी घडली. या अपघातात रिक्षामधील चार प्रवासी आणि रिक्षा चालक गंभीर जखमी झाले. दरम्यान, या अपघातात अडीच वर्षांची मुलगी रुग्णालयात उपचार घेताना मयत झाली, तर एक लहान मुलगा अत्यवस्थ आहे. त्याला अधिक उपचारासाठी बदलापूर येथून मुंबईला नेण्यात आले आहे. नेरळ पोलीस ठाण्यात अपघाताची नोंद करण्यात आली आहे.

दामत येथील रिक्षाचालक नदीम मुश्ताक नजे हे आपली प्रवासी रिक्षा घेऊन सायंकाळी सव्वा सहा वाजता नेरळकडे येत होते. त्या वेळी सौशल्या अपार्टमेंटसमोर मूळची मुंबई बांद्रा येथील एक महिला आपल्या दोन मुलांसह रस्त्याच्या कडेला प्रवासी रिक्षा पकडण्यासाठी नेरळ बाजूच्या रस्त्याला येत होत्या. त्या वेळी प्रवासी येत असल्याचे पाहून रिक्षाचालक नदीम नजे यांनी आपली प्रवासी रिक्षा कल्याण-नेरळ रस्त्याच्या कडेला उभी केली. प्रवासी रिक्षामध्ये बसण्यासाठी येत असताना नेरळ गावाकडून बदलापूरकडे जाणाऱ्या इको कारने आधी त्या महिला आणि त्यांच्यासोबत असलेल्या मुलांना धडक दिली. नंतर पाठीमागून रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या रिक्षालादेखील धडक दिली.

या अपघातात रिक्षामध्ये दामत येथून प्रवास करणारे बाबू भाईजी यांच्या डोक्याला, कमरेला मार लागला तसेच रिक्षाचालक नदीम नजे आणि महिला तसेच दोन लहान मुले गंभीर जखमी झाली. या अपघातात दोन्ही वाहनांचे मोठे नुकसान झाले असून जखमी प्रवासी यांना तातडीने बदलापूर येथील खासगी रुग्णालयात उपचारासाठी नेण्यात आले.

बदलापूर येथे उपचार घेत असताना गंभीर जखमी असलेल्या अडीच वर्षांच्या लहान मुलीचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे, तर जखमी मुलाची प्रकृती गंभीर असून त्याला पुढील उपचारासाठी बदलापूर येथून मुंबई येथे नेण्यात आले आहे.

मुंबई बांद्रा येथील महिलेच्या कुटुंबाची सौशल्या इमारतीत सदनिका असून सुटीसाठी ते नेरळ ममदापूर येथे आले होते. मुंबई येथे परत जाण्यासाठी ते निघाले होते. यामध्ये चिमुकलीचा मृत्यू आणि लहान मुलगा जखमी झाला आहे. या अपघातास कारणीभूत असलेल्या इको कारचालकावर नेरळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. पोलीस निरीक्षक राजेंद्र तेंडुलकर यांनी घटनास्थळी जाऊन पाहणी केली. हवालदार राहुल गायकवाड अधिक तपास करीत आहेत.



**खोपोली : यशवंतनगर शिळफाटा येथे सामाजिक कार्यकर्ते व अण्णा भाऊ साठे विचारमंचचे शंकर कुंडले यांनी गणपतीसमोर वैचारिक आरास देखावा उभारला आहे.** (छाया : अरुण नलावडे)

# आमदार महेंद्र दळवी यांचे 'पद्मदुर्ग'कडून आभार

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड शहराच्या विकासासाठी स्थानिक आमदार महेंद्र दळवी यांनी ५५ कोटी रुपयांहून अधिक निधी देऊन मुरूड शहराचा खरोखर कायापालट केला आहे. आज मुरुड शहरातील सर्व अंतर्गत रस्ते काँक्रीटचे तसेच डांबरीकरण झाले आहेत. नगर परिषदेचे विश्रामगृह, नगर परिषद इमारत, समुद्र किनारा सुशोभीकरण अशा अनेक बाबींचा विकास करून मुरुड शहराचा कायापालट करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावल्याबद्दल पद्मदुर्ग संघटनेचे अध्यक्ष अरविंद गायकर व त्यांच्या संघटनेकडून विशेष आभार पत्र आमदारांना देण्यात आले आहे.

मुरूड शहराला विकासकामांसाठी कधी एवढ्या मोठ्या प्रमाणात निधी मिळाला नव्हता, परंतु आमदार दळवी यांनी निधी देऊन शहराला आवश्यक असणाऱ्या बाबींची पूर्तता करून सर्वांगीण विकासाचे दालन उपलब्ध करून दिले आहे. मुरूड नगरपरिषद ही नवाबकालीन आहे. इतक्या वर्षांच्या काळात एवढा विकास हा कधी उपलब्ध झाला नव्हता. आता आमदार दळवी यांनी हे शक्य करून दाखवले आहे.

# भावेश नाक्ते समर्थकांसह शिवसेनेत

■ आमदार भरत गोगावले यांच्या उपस्थितीत प्रवेश



**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुक्यातील निजामपूर हायस्कूल येथे झालेल्या कार्यक्रमात आमदार भरत गोगावले यांच्या उपस्थितीत निजामपूर विभागातील चाच गावचे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे कार्यकर्ते भावेश नाक्ते यांनी आपल्या समर्थकांसह शिवसेना शिंदे गटात जाहीर प्रवेश केला.

भावेश नाक्ते हे चाच गावातील सामाजिक कार्यकर्ते राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे काम करीत होते. त्यांनी या मतदारसंघाचे आमदार भरत गोगावले यांच्या विकासकामांनी प्रभावित होऊन निजामपूर आमदार गोगावले यांच्या उपस्थितीत समर्थकांसह प्रवेश केला.

या कार्यक्रमास शिवसेनेचे जिल्हाप्रमुख प्रमोद घोसाळकर, युवासेना जिल्हा प्रमुख विपुल उभारे, शिवसेना उपजिल्हा प्रमुख अविनाश नलावडे, उपतालुका प्रमुख नितीन पवार, माजी पं. स. सदस्य सुधीर पवार, युवासेना तालुका प्रमुख राजेश कदम, विभाग प्रमुख मनोज सावंत, कार्यकर्ते, निजामपूर विभागातील ग्रामस्थ, मुंबईकर मंडळी आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या वेळी प्रसारमाध्यमांजवळ बोलताना भावेश नाक्ते म्हणाले की, गावाच्या विकासासाठी माझी तळमळ असून कुंभेवाडी ते घोळ रस्त्याचे काम व्हावे हे आपले स्वप्न आहे. आपण कधीच पदासाठी भुकेले नसून गोरगरीब जनतेची कामे व गावाचा विकास हाच आपला ध्यास आहे. आमदार भरत गोगावले यांच्या विकासकामांना आपण प्रभावित झालो आहोत. त्यांनी मतदारसंघात भरपूर विकासकामे केली असून यापुढेही त्यांनी आपल्या विकासकामांचा झंझावात सुरू ठेवला आहे.

विकासकामे होऊन गोरगरीब जनतेचे प्रश्न सुटावेत याच उद्देशाने मी व माझ्या समर्थकांनी शिवसेनेत प्रवेश केला असून अजून काही लोकांचा प्रवेश येणाऱ्या काळात होईल, असेही नाक्ते यांनी सांगितले.

# खालापुरात हिंदू मुस्लिम ऐक्याचे दर्शन

## पोलीस ठाण्यातील आरतीचा मान मोहल्ला कमिटीला

**चौक : प्रतिनिधी**

खालापूर पोलीस ठाण्यात सालाबादप्रमाणे दहा दिवसांच्या गणरायाचे आगमन झाले आहे. गेली अनेक वर्षे ही परंपरा खालापूर पोलिसांनी सुरु ठेवली आहे. दर दिवशी आरतीचा मान हा सामजिक संघटना,समाजसेवक यांना दिला जातो.



हिंदू-मुस्लिम ऐक्य, जातीय सलोख्याच्या दृष्टीने सर्वधर्मसमभाव एक अनोखा संदेश देण्यासाठी खालापूर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक बाळा कुंभार हे प्रयत्नशील असतात. या अंतर्गत हिंदू व मुस्लिम समाजाचे प्रतिष्ठित नागरिक, शांतता मोहल्ला कमिटीचे सदस्यांना खालापूर पोलीस ठाणे येथील गणपती बाप्पाचे आरतीचा मान ते आवर्जून देत असतात.

या वेळी आरतीचा मान मुस्लिम मोहल्ला कमिटीच्या सदस्यांना देण्यात आला होता. या ठिकाणी मुस्लिम मोहल्ला कमिटी सदस्य यासिन भालदार, ॲड. राजेंद्र येरुणकर, एकनाथ पिंगळे, हेमा चिंबुळकर, पत्रकार अर्जुन कदम, मनोज कळमकर,दीपक जगताप, प्रसाद अटक यांच्यासह पदाधिकारी, नागरिक, पोलीस उपस्थित होते. सर्वांनी आरतीमध्ये सहभाग घेतला.

# कुक्कुट पालनास प्रोत्साहन देणाऱ्या योजना

रायगड जिल्ह्यामध्ये परिसरातील कुक्कुट पालनास प्रोत्साहन देणाऱ्या विविध योजना राबवण्यात येतात.या योजना प्रक्रिया रोजगारक्षम करण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण आहेत. रायगड-अलिबाग जिल्हयातील १४ तालुक्यांमध्ये सार्वजनिक खाजगी भागीदारी तत्वावर सघन कुक्कुट विकास गटाची स्थापना करणे ही योजना २०१७-१८पासून राबवण्यात येत आहे.



या योजनेंतर्गत पशुसंवर्धन विभागाने परिपरित केलेल्या अर्जाचा नमूना तालुक्यातील पशुधन विकास अधिकारी विस्तार यांच्याकडे उपलब्ध राहील. निवड केलेल्या लाभार्थींना हा प्रकल्प तीन वर्ष कार्यान्वित ठेवणे बंधनकारक राहील. निवड केलेल्या लाभार्थ्यांना पाच दिवसांचे कुक्कुट पालन विषयक प्रशिक्षण व खाजगी अंडी उबवणूक केंद्र, शासकीय अंडी उबवणूक केंद्र, लघू अंडी उबवणूक यंत्राचा वापर करीत असलेल्या प्रक्षेत्रावर भेटीचा समावेश आहे. लाभार्थी निवड ही जिल्ह्याच्या पशुसंवर्धन उपआयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली शासन निर्णया प्रमाणे सात सदस्यांच्या गठीत समिती पुढे निवड केली जाणार आहे.

लाभार्थी निवडीसाठी सर्वसाधारण, अनुसूचित जाती उपाययोजना व जनजाती क्षेत्र उपाययोजनेतील जे लाभार्थी सद्यस्थितीत कुक्कुट पालन व्यवसाय करत आहेत तसेच ज्या लाभार्थ्यांकडे अंडी उबवणुकीचे यंत्र आहे. अशा लाभार्थींना प्राधान्य राहील. ३०% महिला लाभार्थींना प्राधान्य देण्यात येणार आहे. प्रथम टप्प्यात जिल्ह्यामध्ये २०१८-१९ या वर्षामध्ये पाच व २०१९-२०२०मध्ये पाच व २०२०-२१मध्ये चार असे वर्षनिहाय एकूण १४ विकास गटांची स्थापना करण्याचे आहे. निवडलेल्या तालुक्यात प्रति तालुका एक लाभार्थी निवडला जाईल.

या योजनेंतर्गत निवडलेल्या लाभार्थीकडे २५०० चौ. फुट जागा स्वतःच्या मालकीची असावी. त्या ठिकाणी दळणवळण, इलेक्ट्रिसीटी, पाण्याची सोय उपलब्ध असावी. या योजनेचे अनुदान एकदाच देय असून पुढील खर्च संपूर्णपणे लाभार्थीने करावयाचा आहे. या योजनेंतर्गत १००० चौ. फुट पक्षीगृहाचे बांधकाम खात्याने ठरवून दिलेल्या मोजमपा प्रमाणे असणे आवश्यक आहे. लाभार्थीने लघु अंडी उबवणूक यंत्राची खरेदी करताना १००० अंडी उबविण्याची क्षमता व १४ केव्हीए क्षमतेचा डिझेल अथवा गॅसवर चालणारे जनरेटर यंत्र असावे. यंत्राची उभारणी व कनेक्शन व दोन वर्षाची वॉरंटी, अंडी उबवणूक यंत्र उत्पादकाकडून लाभार्थीस प्रशिक्षण दिलेले असावे.



प्रकल्प उभारणी नंतर योजनेमध्ये समाविष्ट तपशीलची पडताळणी नेमून दिलेल्या अधिकाऱ्यामार्फत करण्यात येईल.

निवड झालेल्या लाभार्थीने मान्यताप्राप्त एक दिवशीय मिश्र पिल्ले २० आठवडे वयावरील अंड्यांवरील पक्षी, सघन कुक्कुट गट, अंडी, यांची खरेदी सघन कुक्कुट विकास गट/मध्यवर्ती व इतर शासकीय निमशासकीय संस्था कडून जिल्हा स्तरीय निवड समितीच्या शिफारशीने खरेदी करणे बंधनकारक राहील. खरेदीच्या पावल्या, डिलेव्हरी चलन यांची पडताळणी केल्यानंतरच अनुदान थेट लाभार्थीच्या बँक खात्यामध्ये जमा करण्यात येईल. सुरुवातीस आवश्यक लघु अंडी उबवणूक केंद्रास लागणारी अंडी शासकीय संस्थेकडून खरेदी करणे बंधनकारक राहील. तदनंतर लाभार्थीने स्वतःच्या प्रक्षेत्रावर उत्पादित उबवणुकीच्या अंड्यांचा वापर करून पिल्ले निर्मिती करणे आहे.

योजनानिहाय निश्चित किंमत पुढीलप्रमाणे आहे. जमीन व खोल्या लाभार्थीच्या या योजने अंतर्गत जमीन २५०० चौ. फूट, (१००० चौ. फुटाचे २ शेड) खाद्य, अंडी, साठवणूक व अंडी उबवणूक यंत्र ठेवण्यासाठी स्वतःच्या मालकीच्या स्वतंत्र खोल्यांसाठी एकूण अंदाजित किंमत सध्या निरंक निश्चित करण्यात आली आहे.

प्रति १००० चौ. फुटाचे दोन पक्षीगृहाचे बांधकाम, स्टोअर रूम, पाण्याची टाकी व विद्युतीकरण यासाठी या योजने अंतर्गत एकूण अंदाजित किंमत चार लाख रुपये आहे. खाद्य व पाण्याची भांडी, ब्रडर, इतर उपकरणे व लसीकरण या योजनेच्या अंतर्गत शासन व लाभार्थी सहभाग ५० हजार रुपये. अंडी उबवणूक यंत्र (Mini Setter cum Hatcher) एकूण अंदाजित किंमत १ लाख ८० हजार रुपये आहे. १००० एकदिवसीय मिश्र (नर + मादी) पिले व प्रति पक्षी रु.६० या योजने अंतर्गत रु. ६०,०००, २० आठवड्यांची अंड्यावरील ५०० पक्षी (नर+मादी) प्रति पक्षी १५० या योजनेंतर्गत रु. ७५,०००, १००० एकदिवसीय पिलांसाठी २० आठवडे कालावधीपर्यंत पक्षी खाद्यपुरवठा (प्रति पक्षी एकूण ८.५० कि.ग्रॅम खाद्य प्रति किलो रु. २५ दराने) रु.१,१२,५००, एग नेस्ट्स रु.३०,०००, पक्षी खाद्य ग्राईंडर (सिंगल फेज) रु.१६,००० असे एकूण किंमत रु.१०,२७,५०० रुपये असून शासन व लाभार्थी यांचा सहभाग राहिल. सर्व प्रवर्गातील लाभार्थ्यांना ५०% अनुदान म्हणजेच रु. ५,१३,००० शासनाचे अनुदान देय राहील.

अर्ज करणाऱ्या शेतकऱ्यांनी शासन निर्णय क्र. कुक्कुट २०१७/प्र.क्र.६७/पदुम-४, मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई-४०००३२, दिनांक. १३ नोव्हेंबर, २०१७ व मार्गदर्शक सूचना जा.क्र. कुक्कुट-२/५४२८/पीपीपी मॉडेल / २०१७, पसं१३, पुणे ६७, दिनांक-२३/११/२०१७नुसार अर्ज करावा, सूचना व योजनेच्या अंमलबजावणी बाबत तालुक्यातील पशुधन विकास अधिकारी (विस्तार) पंचायत समिती यांच्याशी संपर्क साधावा.

पोलादपूर, श्रीवर्धन, मुरुड, सुधागड पाली, कर्जत, अलिबाग या तालुक्यातून पुरेसा प्रतिसाद अद्यापपर्यंत न मिळाल्याने या योजनेसाठी नव्याने अर्ज मागवण्यात येत आहेत. या सहा तालुक्यातून प्राप्त अर्जातून प्रत्येकी एका लाभार्थ्याची जिल्हा निवड समितीमार्फत निवड करण्यात येईल. सूचना व योजनेच्या अंमलबजावणीबाबत तालुक्यातील पशुधन विकास अधिकारी (विस्तार) पंचायत समिती यांच्याशी संपर्क साधावा.

**-डॉ. आर. बी. काळे**
**जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त**
**(संकलन : जिल्हा माहिती कार्यालय, रायगड-अलिबाग)**

